
दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ

बीड महाराष्ट्र | शनिवार, 28 मार्च 2026 | | अंक क्र. 308 | वर्षे 3 रे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4

Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com










# ना. पंकजाताई मुंडेंसह नाथऱ्यात लेकींच्या मांदियाळीत संपन्न झाला श्रीमद् देवी भागवत कथा सप्ताह

## सन्मान आणि अभिमानाने सर्व लेकी एकत्र आल्या ; इथल्या मातीत मोठी शक्ती

## सांगता सोहळ्यात ना.पंकजाताई मुंडे यांनी व्यक्त केल्या भावना

**परळी | प्रतिनिधी**

नाथऱ्याच्या मातीत मोठी शक्ती आहे. इथल्या मातीने विविध क्षेत्रात आपल्या कार्याचा ठसा उमटवणारे दिग्गज दिले आहेत. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यासारखा लोकनेता नाथऱ्याने देशाला दिला. नाथऱ्याच्या लेकी आज सन्मानाने आणि अभिमानाने एकत्र आल्या आहेत. अध्यात्माची गोडी वाढवणारा हा सोहळा लेकींनी आयोजित करून एकजुटीची भावना वाढीस लावली असल्याचे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी येथे सांगितले.

नाथरा येथे विविध गावात सासरी गेलेल्या लेकींनी एकत्रित येऊन श्रीमद् देवी भागवत कथा सप्ताह आयोजित केला होता. कथेच्या सांगता सोहळ्यास ना. पंकजाताई मुंडे आणि आ. धनंजय मुंडे उपस्थित होते. याप्रसंगी स्वररत्न ह.भ.प अंजलीताई केंद्रे यांच्या सुमधुर वाणीतून काल्याचे कीर्तन संपन्न झाले, ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या सुश्राव्य कीर्तनाचे श्रवण करून उपस्थित भाविकांशी संवाद साधला.

श्रीमद देवी कथेला लेकींचा विशेष मान असतो, आज कथेच्या निमित्ताने नाथऱ्याच्या लेकी सन्मानाने आणि अभिमानाने इथे एकत्र आल्या आहेत. लेकींचा सन्मान करण्याची आपली संस्कृती यानिमित्ताने वृद्धिंगत होईल, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी देखील चैत्र नवरात्रेनिमित्त कन्या पूजन करतात. मध्य प्रदेश मध्ये शिवराजसिंह चौहान अत्यंत आदरपूर्वक लेकींचे कन्या पूजन करतात, यातून लेकींचा सन्मान होतो असे पंकजाताई मुंडे म्हणाल्या. आज या कथेच्या माध्यमातून अत्यंत सुंदर सोहळा पार पडतो आहे. यानिमित्ताने मला सर्वांशी संवाद साधता आला. नाथऱ्याच्या मातीत मोठी शक्ती आहे. लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब, पंडित अण्णा मुंडे, धनंजय मुंडे,डॉ.प्रितमताई मुंडे यांच्यासारखे दिग्गज नेते आपल्या नाथऱ्याने दिले असल्याचे त्या म्हणाल्या. अध्यात्म आणि एकजुटीची भावना वाढीस लावणारा हा सोहळा होता, आयोजक लेकींचे मनापासून आभार मानत ना. पंकजाताई मुंडे यांनी सर्वांचे यश, कीर्ती आणि आरोग्यासाठी प्रार्थना करते म्हणतं त्यांनी सर्वांना शुभेच्छा दिल्या. सांगता सोहळ्यानंतर ना. पंकजाताई मुंडे यांनी सर्व महिला भगिनींसोबत पंगतीत बसून महाप्रसादाचा लाभ घेतला.

# रेणापूर तालुका क्रीडा संकुलाचे भाजपा नेते आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते भूमिपूजन

**लातूर | प्रतिनिधी**



रेणापूर येथे नव्याने विकसित होत असलेल्या साडेतीन कोटी रुपये खर्चाच्या तालुका क्रीडा संकुलाचे भूमिपूजन भाजपाचे नेते लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते शुक्रवारी करण्यात आले.

रेणापूर येथे सुसज्ज क्रीडा संकुल उभे राहावे अशी रेणापूर तालुक्यातील विविध खेळातील खेळाडूंची अनेक दिवसांची मागणी प्रत्यक्षात कार्यान्वित होत असून या क्रीडा संकुलनासाठी आ. रमेशअप्पा कराड यांच्या प्रयत्नातून राज्य शासनाकडून ३ कोटी ३८ लाख रुपयाचा निधी मंजूर झाला आहे. या निधीतून कबड्डीचे चार मैदान, खो-खो खेळाचे दोन मैदान, बॅडमिंटन खेळाचा हॉल, कार्यालयीन इमारत, ४०० मीटर लांबीचा धावनपथ (रनिंग टेक), आणि कंपाउंड वॉल आदी कामे करण्यात येणार आहेत.

रेणापूर तालुका क्रीडा संकुलनाचे भूमिपूजन भाजपाचे नेते आ. रमेशअप्पा कराडे यांच्या शुभहस्ते शुक्रवारी करण्यात आले याप्रसंगी तहसीलदार प्रशांत थोरात, सा. बा. विभागाचे उप अभियंता लक्ष्मण देवकर, पंस उपसभापती शरद दरेकर, रेणापूरच्या नगराध्यक्षा श्रीमती शोभा आकनगिरे, सह अभियंता प्रवीण पवार, तालुका क्रीडा अधिकारी सुरेंद्र कराड, भाजपाचे महेंद्र गोडभरले, ॲड. दशरथ सरवदे, अनिल भिसे, पंस सदस्या सौ. शितल राऊतराव यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी आ. कराड यांनी तालुका क्रीडा संकुल कामाची माहिती जाणून घेतली आणि महत्वपूर्ण सूचना केले. याप्रसंगी लक्ष्मण यादव, रमेश कटके, अजय राठोड, निवृत्ती चिद्रे, ओम चव्हाण, नामदेव बोंबडे, डॉ. बाबासाहेब घुले, वसंत करमुडे, राम मोरे, संतोष चव्हाण, अच्युत कातळे, राजू आत्तार, अशोक राठोड, गणेश चव्हाण, श्रीकृष्ण पवार, मोहनराव सिरसाट, नारायण राठोड, उत्तम चव्हाण, गोपाळ पडिले, राजकुमार आलापुरे, श्रीमंत नागरगोजे, रामा चव्हाण, सुरेश बुड्डे, अजित पाटील, शिवाजी जाधव, सिद्धेश्वर मामडगे, राम बडे, लक्ष्मण खलंग्रे, हनुमंत भालेराव, राजू मानमोडे यांच्यासह भाजपाचे लोकप्रतिनिधी, पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# केज नगरपंचायतसमोर शेतकरी कामगार पक्षाचे 'अन्नत्याग आंदोलन'

## विविध घोटाळ्यांच्या चौकशीसह १४ मागण्यांवर ठाम भूमिका

**केज | प्रतिनिधी**

केज नगरपंचायत परिसरात शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने विविध प्रलंबित प्रश्न आणि कथित आर्थिक गैरव्यवहारांविरोधात अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात आले आहे. घरकुल घोटाळा, विकासकामांतील अनियमितता, निधी अपहार आणि प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आंदोलनकर्त्यांनी १४ प्रमुख मागण्यांचा पाढा वाचला आहे.

आंदोलनकर्त्यांचा आरोप आहे की, शासनाच्या विविध योजनांमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झाला असून पात्र लाभार्थ्यांना न्याय मिळालेला नाही. त्यामुळे संबंधित प्रकरणांची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे.




### आंदोलनाच्या प्रमुख मागण्या

- **१) पंतप्रधान आवास योजना (२०१८-१९) अंतर्गत पात्र लाभार्थ्यांचे ३ कोटी ६२ लाख रुपये अपहार झाल्याचा आरोप; ही रक्कम परत देण्यात यावी किंवा लाभार्थ्यांना घरकुल उपलब्ध करून द्यावे.**
- **२) घरकुल घोटाळ्यातील रक्कम इतरत्र वळवणाऱ्या संबंधित दोषींवर कारवाई करून रक्कम वसूल करण्यात यावी.**
- **३) दलित वस्ती सुधार योजना (दि. ५/८/२०१९) अंतर्गत सभागृहासाठी मंजूर ३२.९५ लाख रुपयांचा निधी कसा खर्च झाला, याची चौकशी करावी.**
- **४) ३१/१२/२०२० च्या 'दलितेत्तर' योजनेतून मंजूर ८०.६० लाख रुपयांचा रस्ता (मंगळवार पेठ कॉर्नर ते आंबेडकर चौक) प्रत्यक्षात न करताच बिल काढल्याचा आरोप; या प्रकरणाची चौकशी करावी.**
- **५) ३१/१२/२०२१ च्या दलित वस्ती सुधार योजनेतून फुलेनगर रस्त्यासाठी मंजूर १.६३ कोटी रुपयांच्या कामाची गुणवत्ता तपासणी करून चौकशी करावी.**
- **६) केज नगरपंचायतीच्या जनरल खात्यातून २०१९ ते मार्च २०२६ दरम्यान झालेल्या खर्चाचा तपशील जाहीर करावा.**
- **७) वाईन शॉपसाठी नियमबाह्य पद्धतीने ना हरकत प्रमाणपत्र देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करून संबंधित कागदपत्रे उपलब्ध करून द्यावीत.**
- **८) जिल्हा परिषद माध्यमिक शाळेची जागा हस्तांतरणाबाबत घेतलेला ठराव रद्द करावा.**
- **९) पंतप्रधान आवास योजनेतील मंजूर १२१५ घरकुल धारकांना तात्काळ निधी वितरित करावा.**
- **१०) केज शहरातील विकासकामांसाठी देण्यात आलेल्या ना हरकत प्रमाणपत्रांची यादी जाहीर करावी.**
- **११) गायराण धारकांना मालकी हक्क (कबाला) पत्रे वाटप करावीत.**
- **१२) केज शहरातील शेतकऱ्यांना ग्रामीण योजनांचा लाभ देण्यात यावा.**
- **१३) दिव्यांग लाभार्थ्यांना स्थानिक निधीतून ५% निधी तात्काळ वाटप करावा.**
- **१४) २०१५ ते २०२६ दरम्यान राबविण्यात आलेल्या विविध योजनांतील कथित भ्रष्टाचाराची चौकशी करण्यासाठी उच्चस्तरीय समिती स्थापन करावी.**

आंदोलनकर्त्यांनी स्पष्ट इशारा दिला आहे की, मागण्यांवर ठोस निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्यात येईल. नागरिकांच्या हक्कासाठी हा लढा सुरू असून न्याय मिळेपर्यंत माघार घेतली जाणार नाही, असा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

# उजनीचे पाणी मांजरा धरणात आणा; खा.बजरंग सोनवणेंनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे केंद्राचे वेधले लक्ष

## संसदेत उठविला आवाज, शेतकऱ्यांना वेळेत मदत देण्याचीही मागणी

**नवी दिल्ली | प्रतिनिधी**

मराठवाड्याच्या हक्काच्या पाण्यासाठी आणि बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्यांसाठी खा.बजरंग सोनवणे यांनी दि.२७ मार्च रोजी संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात आवाज उठवला. सोलापूरच्या उजनी धरणातून मांजरा नदीमार्गे मांजरा धरणात पाणी आणण्याचा प्रकल्प त्वरित मार्गी लावावा, अशी आग्रही मागणी करत त्यांनी बीडच्या दुष्काळी परिस्थितीकडे केंद्र सरकारचे लक्ष वेधले.

दिल्लीत सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात बीडचे खा.बजरंग सोनवणे बोलत होते. यावेळी दुष्काळ आणि अस्मानी संकटाबाबत खा.सोनवणे यांनी आपल्या भाषणात बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा मांडल्या. ते म्हणाले की, बीडचा शेतकरी दरवर्षी दुष्काळाच्या झळा सोसतोय. यावर्षी त्यात वादळ, अतिवृष्टी आणि अवकाळी पावसाची भर पडली आहे. निसर्गाच्या या लहरीपणामुळे कष्टाचे पीक डोळ्यादेखत मातीत जात असून, शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. या अस्मानी आणि सुलतानी संकटामुळे शेतकरी आत्महत्या करत असून ही बाब अत्यंत गंभीर आणि वेदनादायक असल्याचे त्यांनी नमूद केले. बीड जिल्ह्यातील दुष्काळावर तोडगा काढण्यासाठी बाहेरून जिल्ह्यात पाणी आणल्याशिवाय पर्याय नाही. बीड जिल्ह्याला कायमस्वरूपी दुष्काळमुक्त करण्यासाठी उजनीचे पाणी मांजरा धरणात आणणे हाच एकमेव पर्याय असल्याचे सोनवणे यांनी ठामपणे सांगितले. हा प्रकल्प पूर्ण झाल्यास बीडच्या शेतकऱ्यांसाठी ते 'जीवनदायी' ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

### दिरंगाईवर ओढले ताशेरे

- **१ बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना वेळेत कर्ज मिळत नाही, शेतीच्या योजनांचा लाभही उशीरा मिळतो, एकूणच जिल्ह्यातील प्रशासकिय दिरंगाई कमी व्हावी, असेही ते म्हणाले.**
- **२ शेतकऱ्यांना कर्जव्याज सवलत, अनुदान आणि पीकविम्याची रक्कम वेळेवर मिळत नाही. हक्काच्या पैशांसाठी बळीराजाला बँकांचे उंबरठे झिजवावे लागतात.**
- **३ सोयाबीन, मका, तूर आणि ज्वारीची हमीभावाने खरेदी तर होते, पण त्याचे पैसे मिळायला महिनोन् महिने वाट पाहावी लागते. हा अन्याय तातडीने थांबवून चुकारे वेळेत देण्याची मागणी त्यांनी केली.**
- **४ व्याज सवलतीसारख्या अनेक योजना कागदावरच राहतात. पात्र शेतकऱ्यांना या योजनांपासून वंचित ठेवणाऱ्या बँकांवर कारवाई करण्याची मागणी त्यांनी संबंधित मंत्रालयाकडे केली.**

मराठवाड्याच्या हक्काचे पाणी, मदत आणि न्याय मिळेपर्यंत माझा हा लढा थांबणार नाही. बीडच्या शेतकऱ्याचा आवाज मी संसदेत असाच बुलंद ठेवेन. बीड जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या विश्वासाने दिल्लीत पाठविले असून मी त्यांचे प्रश्न मांडण्यास कमी पडणार नाही.



# बीड जिल्हा पोलिस भरती प्रक्रियेत VJA प्रवर्गातून टॉपर

## प्रतिज्ञा यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे

■ विशेष वृत्तांकन – नितीन ढाकणे

परिस्थिती कितीही कठीण असली, तरी जिद्द आणि मेहनत असेल तर यश नक्की मिळते. याचा प्रत्यय पुन्हा एकदा बीड जिल्ह्यातील प्रतिज्ञा विनायक जाधव (पती – अरुण राठोड) यांच्या यशातून आला आहे. बीड जिल्हा पोलिस भरती प्रक्रियेत VJA प्रवर्गातून टॉपर ठरत त्यांनी पहिल्याच प्रयत्नात दैदिप्यमान यश संपादन केले आहे. त्यांच्या या यशामुळे संपूर्ण जिल्ह्यात अभिमानाची भावना निर्माण झाली आहे.

पांगरी तांडा येथील सासर आणि तडोळी तांडा येथील माहेर अशा अत्यंत साध्या आणि ग्रामीण पार्श्वभूमीतून आलेल्या प्रतिज्ञा यांनी प्रतिकूल परिस्थितीवर मात करत स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे. आर्थिक मर्यादा, सामाजिक बंधने आणि घरगुती जबाबदाऱ्या या सर्व अडथळ्यांवर मात करत त्यांनी हे यश मिळवले, हे त्यांच्या संघर्षशील वृत्तीचे द्योतक आहे.

विशेष म्हणजे, साडेचार वर्षांच्या लहान मुलाचे संगोपन करत, घरातील सर्व जबाबदाऱ्या पार पाडत आणि स्वतःचे शिक्षण सुरू ठेवत त्यांनी पोलिस भरतीची तयारी केली. सध्या त्या बी.कॉम द्वितीय वर्षात शिक्षण घेत असून, गेल्या एका वर्षापासून त्यांनी शारीरिक आणि लेखी परीक्षेसाठी सातत्याने सराव केला. त्यांच्या दिवसाची सुरुवात पहाटेच होत असे—धावणे, व्यायाम, शारीरिक कसोटीची तयारी आणि त्यानंतर घरातील कामे व मुलाची काळजी. या सगळ्या धावपळीतून वेळ काढत त्यांनी अभ्यासही तितक्याच निष्ठेने केला.

प्रतिज्ञा जाधव यांच्या यशामागे त्यांच्या कुटुंबाचा पाठिंबाही तितकाच महत्त्वाचा ठरला. सासर आणि माहेर या दोन्ही कुटुंबांनी त्यांना प्रोत्साहन दिल्यामुळेच त्या निर्धाराने पुढे जाऊ शकल्या. विशेष बाब म्हणजे, त्यांच्या माहेर आणि सासर या दोन्ही घराण्यात पोलिस दलात दाखल होणाऱ्या त्या पहिल्याच महिला ठरल्या आहेत. त्यामुळे त्यांच्या यशाने केवळ कुटुंबच नव्हे, तर संपूर्ण गाव आणि परिसरात प्रशंसा केली जात आहे.

ग्रामीण भागातील मुलींना अनेकदा शिक्षण आणि करिअरच्या संधी मर्यादित असतात. मात्र, प्रतिज्ञा यांनी आपल्या यशातून हे सिद्ध केले आहे की, परिस्थिती कितीही कठीण असली तरी इच्छाशक्ती, आत्मविश्वास आणि अथक परिश्रम यांच्या जोरावर कोणतेही ध्येय गाठता येते. त्यांच्या या कामगिरीमुळे अनेक तरुणींना नवी दिशा आणि प्रेरणा मिळाली आहे.

आज प्रतिज्ञा जाधव या केवळ एक यशस्वी उमेदवार नाहीत, तर त्या संघर्ष, धैर्य आणि आत्मविश्वास यांचे प्रतीक बनल्या आहेत. त्यांची ही यशोगाथा समाजासाठी प्रेरणादायी ठरत असून, “स्वप्न पाहा आणि त्यासाठी प्रयत्न करा” हा संदेश त्या आपल्या कृतीतून देत आहेत.







**संपूर्ण गाव आणि परिसरात प्रशंसा केली जात आहे.**

---

# शाळा आपल्या दारी! मुलांच्या उज्वल भविष्यासाठी शिक्षण विभागाची विशेष मोहीम

## आता जिल्हा परिषद शाळाही होणार 'स्मार्ट'

■ मुंबई/पुणे:

राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या, विशेषतः मराठी शाळांमधील विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढवण्यासाठी आणि या शाळांना सुवर्णदिवस मिळवून देण्यासाठी शालेय शिक्षण मंत्री श्री. दादाजी भुसे यांच्या मूळ संकल्पनेतून आणि पुढाकाराने मार्च ते जून २०२६ या कालावधीत व्यापक उपक्रम राबविले जाणार आहेत. खाजगी शाळांच्या स्पर्धेत सरकारी शाळांचा टक्का वाढवण्यासाठी 'राज्य स्तर समितीने' नुकताच आपला सविस्तर अहवाल सादर केला असून, त्यामध्ये नाविन्यपूर्ण उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत.

नवीन शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच 'गुढीपाडवा, पट वाढवा' हे विशेष अभियान राबवून गावपातळीवर प्रवेशाचा संकल्प केला जाणार आहे. या अभियानासाठी विशेष 'गीत' तयार करण्यात आले असून, त्याद्वारे जिल्हा परिषद शाळांमधील स्मार्ट टीव्ही, मोफत गणवेश, पाठ्यपुस्तके आणि पोषण आहार अशा सुविधांची माहिती घराघरात पोहोचवली जाणार आहे.




केवळ जाहिरातबाजी न करता, शिक्षक आणि शाळा व्यवस्थापन समितीचे सदस्य स्वतः दाखलपात्र विद्यार्थ्यांच्या घरी जाऊन 'शाळा आपल्या दारी' उपक्रमांतर्गत पालकांशी संवाद साधणार आहेत. मुलांच्या प्रगतीत मातांचा सहभाग वाढवण्यासाठी 'माता-पालक मेळावे' आयोजित केले जातील, ज्यात मुलांचा आहार, आरोग्य आणि अभ्यासाच्या सवयींवर चर्चा केली जाईल. पालकांचा इंग्रजी माध्यमांकडे असलेला ओढा लक्षात घेऊन, शिक्षणमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांमध्येही 'सेमी-इंग्रजी' वर्ग सुरू करण्यावर विशेष भर दिला जात आहे. तसेच, शाळेच्या यशस्वी माजी विद्यार्थ्यांचे यशोगान करणारे व्हिडिओ समाजमाध्यमांवर प्रसारित करून शाळांची विश्वासार्हता वाढवली जाणार आहे.

या मोहिमेचे वैशिष्ट्य म्हणजे यामध्ये स्थानिक प्रशासनालाही जोडण्यात आले आहे. जे पालक आपल्या पाल्याचा प्रवेश जिल्हा परिषद शाळेत घेतील, त्यांना प्रोत्साहन म्हणून स्थानिक करात सवलत देण्यासारखे 'करमाफी अभियान' राबविण्याचे आवाहन ग्रामपंचायतींना करण्यात आले आहे. याशिवाय, शिक्षणाची वारी, ग्रंथदिंडी आणि चावडी वाचन यांसारख्या उपक्रमांतून संपूर्ण गाव शैक्षणिकदृष्ट्या साक्षर करण्याचा मानस आहे.

प्रशासकीय स्तरावरही या मोहिमेची अंमलबजावणी कडक केली जाणार आहे. जिल्ह्यातील शिक्षण विभागातील वर्ग १ ते ३ मधील अधिकारी प्रत्येक 'केंद्र दत्तक' घेतील आणि तेथील भौतिक सुविधा व गुणवत्तेवर वैयक्तिक लक्ष देतील. प्रत्येक बीट स्तरावर एक 'आदर्श शाळा' मॉडेल म्हणून विकसित केली जाणार आहे.

शालेय शिक्षण मंत्री श्री .दादाजी भुसे यांनी याविषयी माहिती देताना सांगितले की राज्यातील प्रत्येक विद्यार्थ्याला दर्जेदार आणि प्रगत शिक्षण मिळावे, हे आमचे उद्दिष्ट आहे. ग्रामीण भागातील शिक्षणाचा कणा असलेल्या आपल्या जिल्हा परिषद शाळांना आधुनिक सुविधांनी सज्ज करण्यासाठी आम्ही 'सेमी-इंग्रजी' आणि 'स्मार्ट क्लास' सारखे बदल घडवून आणत आहोत. 'गुढीपाडवा, पट वाढवा' या अभियानाच्या माध्यमातून लोकसहभाग वाढवून आपण मराठी शाळांचे वैभव पुन्हा प्राप्त करूया. पालक, शिक्षक आणि स्थानिक प्रतिनिधींनी या मोहिमेत सक्रिय सहभाग नोंदवावा.

---

# बरकत नगरमधील वीज समस्या सुधारा, अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा नगरसेविका आयेशा मोसीन यांची मागणी

■ परळी वैजनाथ: प्रतिनिधी

शहरातील बरकत नगर (प्रभाग-३) भागातील वीज समस्या गेल्या अनेक वर्षांपासून गंभीर बनली असून, याकडे महावितरण प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नगरसेविका शेख आयेशा मोसीन यांनी केला आहे. या संदर्भात त्यांनी महावितरणच्या सहाय्यक अभियंत्यांना लेखी निवेदन देऊन तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

वीज सतत खंडित होत असल्यामुळे प्रभागात नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे, ज्यातून वादाचे प्रसंगही उद्भवत आहेत. प्रशासनाने या समस्यांकडे तातडीने लक्ष देऊन प्रभाग-३ मधील ही सर्व प्रलंबित कामे पूर्ण करावीत, अशी विनंती करण्यात आली आहे.

या निवेदनाच्या प्रती कार्यकारी अ भियंता (अंबाजोगाई), अधीक्षक अ भियंता (बीड) आणि मुख्य अभियंता (लातूर) यांनाही पाठवण्यात आल्या आहेत.

### प्रमुख समस्या आणि मागण्या–

■ नगरसेविका आयेशा मोसीन यांनी पत्राद्वारे महावितरणचे लक्ष खालील महत्त्वाच्या मुद्द्यांकडे लक्ष वेधले आहे.

### जुने खांब आणि लोंबकळणाऱ्या तारा

■ प्रभागात गेल्या १० ते २० वर्षांपासून जुने खांब आणि लोंबकळणाऱ्या तारांमुळे अपघाताची भीती निर्माण झाली आहे. सद्यस्थितीत २० ते २५ नवीन पोल बसवणे आवश्यक आहे.

### डी.पी. (रोहित्र) ची क्षमता वाढवणे

■ मिलीया शाळा आणि उस्मानीया मशीद जवळील १०० केव्हीच्या डी.पी. वर मोठा ताण येत असल्याने त्यांची क्षमता २०० केव्ही पर्यंत वाढवावी.

■ कमी उंचीचे डी.पी.: अनेक ठिकाणी डी.पी. हाताला लागतील इतक्या कमी उंचीवर आहेत, त्यांची उंची वाढवणे सुरक्षिततेच्या दृष्टीने गरजेचे आहे.

### नवा फीडर बसवण्याची गरज

■ सध्याचा ११ केव्ही काळ रात्री फीडर ओव्हरलोड होत असल्याने दररोज सकाळी आणि संध्याकाळी ४-४ तास वीजपुरवठा खंडित केला जातो. यामुळे नागरिक त्रस्त असून नवीन फीडर तातडीने मंजूर करावा.

■ "वीज सतत खंडित होत असल्याने नागरिकांमध्ये संताप असून, वादविवादाचे प्रसंग उद्भवत आहेत. प्रशासनाने याकडे गांभीर्याने लक्ष देऊन प्रभागातील ही कामे तातडीने पूर्ण करावीत. अशी मागणी शेख आयेशा मोसीन (नगरसेविका, नगरपरिषद परळी वैजनाथ) यांनी निवेदनाद्वारे केली आहे. आता महावितरण यावर काय पाऊले उचलते, याकडे बरकत नगरवासीयांचे लक्ष लागले आहे.



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# रामभक्तांचे आमरण उपोषण यशस्वी

**पोलीस प्रशासनाने बाहेर चुकीची माहिती पसरवल्याचा रामभक्तांचा आरोप**

**संबंधित पोलीस अधिकाऱ्याचे निलंबन करून चौकशी करण्याची केली होती मागणी**

**संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबन व चौकशीची रामभक्तांनी लावून धरली मागणी**





विशेष बातमीपत्र | सिरसाळा

संपूर्ण देशभरात आणि परदेशातही मोठ्या उत्साहात साजरा होणारा प्रभू श्रीरामांचा जन्मोत्सव यंदा सिरसाळा येथे वादाच्या भोवऱ्यात सापडल्याचे चित्र पाहायला मिळाले. रामनवमी निमित्त काढण्यात येणाऱ्या पारंपरिक मिरवणुकीस परवानगी नाकारण्यात आल्याचा आरोप करत रामभक्तांनी थेट आमरण उपोषणाचा मार्ग स्वीकारला होता. अखेर प्रशासनाने मध्यस्थी करत तोडगा काढल्याने हा तणाव निवळला.

## राज्यभरातून आंदोलनाची विचारपूस-

- **आंदोलनाची दखल राज्यभरातून घेतली गेली. विविध ठिकाणांहून आंदोलनकर्त्यांशी संपर्क साधून विचारपूस करण्यात येत होती. काही आमदार, खासदार आणि मंत्र्यांनीही या प्रकरणाची माहिती घेतल्याचे सांगितले जाते.**

## मिरवणुकीसाठी जाणून-बुजून अडथळा निर्माण करण्याचा आरोप -

- **सिरसाळा येथील रेणुका माता मंदिर परिसरातून दरवर्षी रामनवमीची शोभायात्रा, पारंपरिक कार्यक्रम आणि मिरवणूक मोठ्या उत्साहात काढली जाते. मात्र, यंदा पोलिस प्रशासनाने मिरवणुकीस अडथळा आणण्याचा प्रयत्न केल्याचा आरोप रामभक्तांनी केला.**



मागील तीन-चार वर्षांपासून या मिरवणुकीसाठी त्याच पारंपरिक मार्गाची परवानगी मिळावी यासाठी सातत्याने पत्रव्यवहार केल्याचे रामभक्तांचे म्हणणे आहे. तरीदेखील स्थानिक पोलिसांकडून मुद्दाम अडथळे निर्माण केले जात असल्याचा गंभीर आरोप करण्यात आला.

## आमरण उपोषणाचा मार्ग-

- **या पार्श्वभूमीवर संतप्त रामभक्तांनी रेणुका माता मंदिर येथे आमरण उपोषण सुरू केले. रामनवमीपासून सुरू झालेले हे उपोषण 27 मार्चपर्यंत सुरूच होते. "जोपर्यंत मिरवणुकीस परवानगी मिळत नाही, तोपर्यंत माघार नाही" असा ठाम पवित्रा आंदोलनकर्त्यांनी घेतला होता.**
- **या आंदोलनाची दखल राज्यभरातून घेतली गेली. विविध ठिकाणांहून आंदोलनकर्त्यांशी संपर्क साधून विचारपूस करण्यात येत होती. काही आमदार, खासदार आणि मंत्र्यांनीही या प्रकरणाची माहिती घेतल्याचे सांगितले जाते**

## पोलिसांवर गंभीर आरोप-

- **रामभक्तांनी पोलिस प्रशासनावर स्थानिक परिस्थितीबाबत चुकीची माहिती पसरवल्याचा आरोप करत संबंधित अधिकाऱ्यांचे निलंबन व चौकशीची मागणी केली. "मिरवणूक रोखून कुठेतरी दंगल घडवण्याचा प्रयत्न आहे का?" असा सवालही उपस्थित करण्यात आला.**

## प्रशासनाचा हस्तक्षेप आणि तोडगा -

- **परिस्थिती चिघळत असल्याचे लक्षात घेऊन प्रशासनाने पुढाकार घेत सर्व पक्षांशी चर्चा केली. अखेर सामंजस्याने तोडगा काढण्यात आला.**
- **यानुसार, येत्या 2 एप्रिल रोजी हनुमान जयंतीनिमित्त रामनवमीची प्रलंबित मिरवणूक काढण्यास परवानगी देण्यात आली. विशेष म्हणजे, ज्या पारंपरिक मार्गावरून इतर मिरवणुका आणि महापुरुषांच्या रॅल्या निघतात, त्याच मार्गावरून ही मिरवणूक काढण्यास हिरवा कंदील देण्यात आला.**

## आंदोलनाची सांगता

- **प्रशासनाच्या या निर्णयानंतर रामभक्तांनी समाधान व्यक्त करत उपोषण मागे घेतले. "शेवटी न्याय मिळाला" अशी भावना आंदोलनकर्त्यांनी व्यक्त केली.**
- **शेवटी प्रशासनाला परवानगी द्यावी लागली.**
- **सिरसाळा येथील हा प्रकार प्रशासन आणि नागरिक यांच्यातील संवाद किती महत्त्वाचा आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.**

# परळीत ना. पंकजाताई मुंडे यांचा हाऊसफुल्ल 'जनता दरबार'





**परळी वैजनाथ :** राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांनी परळी येथे 'जनता दरबार' आयोजित केला होता. या जनता दरबारात परळी मतदारसंघ व तालुक्यातील आलेल्या शेकडो नागरिकांच्या समस्या त्यांनी प्रत्यक्ष जाणून घेतल्या आणि अनेक प्रलंबित कामांना तात्काळ मार्गी लावले.

शासकीय विश्रामगृह येथे आयोजित या जनता दरबारात सकाळपासूनच नागरिकांनी गर्दी केली होती. रस्ते, पाणीपुरवठा, वीज वितरण, महसूल विभागातील प्रलंबित प्रकरणे आणि वैयक्तिक लाभाच्या योजना अशा विविध समस्या घेऊन नागरिक आले होते. यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केवळ अर्ज स्वीकारले नाहीत, तर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सांगून जागेवर प्रश्नांचा निपटारा केला. जनतेचे प्रश्न सोडवणे हे माझे कर्तव्य आहे. सामान्यांची अडवणूक खपवून घेतली जाणार नाही, असा इशाराही त्यांनी अधिकाऱ्यांना दिला.

**नागरिक सुखावले :**

आपल्या लाडक्या नेत्या थेट जनतेत मिसळून संवाद साधत असल्याने उपस्थितांमध्ये समाधानाचे वातावरण होते. 'ताईंनी आमचं म्हणणं ऐकून घेतलं आणि कामाचा शब्द दिला, आता आमचा प्रश्न सुटेल,' अशी भावना जनता दरबारात सहभागी नागरिकांनी व्यक्त केली. या जनता दरबाराला स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि विविध विभागांचे शासकीय अधिकारी उपस्थित होते.

# नववे बौद्ध साहित्य संमेलन नागपूर येथे होणार ; संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ.प्रकाश खरात यांची निवड

**स्वागताध्यक्ष जितेंद्र वासनिक, बौद्ध साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांची माहिती**

अंबाजोगाई (प्रतिनिधी)

बौद्ध साहित्य परिषदेच्या केंद्रीय कार्यकारिणीची बैठक नुकतीच नागपूर येथे आयोजित करण्यात आली होती. या बैठकीच्या अध्यक्षस्थानी बौद्ध साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे हे होते. बैठकीत आगामी नववे बौद्ध साहित्य संमेलन नागपूर येथे आयोजित करण्याचा निर्णय घेण्यात आला असून, या संमेलनाच्या संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ.प्रकाश खरात यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. अशी माहिती संमेलनाचे स्वागताध्यक्ष जितेंद्र वासनिक, बौद्ध साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांनी दिली आहे. डॉ.प्रकाश खरात यांच्या निवडीचे संपूर्ण महाराष्ट्रातून स्वागत होत आहे.

आतापर्यंत महाराष्ट्रातील विविध ठिकाणी बौद्ध (पाली) साहित्य संमेलनांचे यशस्वी आयोजन करण्यात आले आहे. यापूर्वीच्या सर्व संमेलनांच्या माध्यमातून पाली भाषा, साहित्य व संस्कृती यावर सखोल विचार विनिमय व चर्चा होत असून, त्यातून फुले-शाहू-आंबेडकर चळवळ अधिक बळकट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे. यापूर्वी या संमेलनाचे अध्यक्षपद ज्येष्ठ विचारवंत डॉ.आ.ह.साळुंखे, डॉ.यशवंत मनोहर, ज्येष्ठ पत्रकार उत्तम कांबळे, डॉ.प्रदीप आगलावे, कथाकार योगीराज वाघमारे, प्रा.दत्ता भगत, पद्मश्री लक्ष्मण माने आणि डॉ.नरेंद्र जाधव यांनी भूषविले आहे. गतवर्षी पुणे येथे संविधान केंद्रस्थानी ठेवून या साहित्य संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. अलीकडेच केंद्र शासनाकडून पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर, यंदाच्या संमेलनात पाली भाषेच्या विकास आणि अनुवादा संदर्भात साधक-बाधक बाबीं तसेच भविष्यातील दिशा यावर सविस्तर चर्चा करण्यात येणार आहे अशी माहिती बौद्ध साहित्य परिषदेचे सचिव डॉ.शंकर वाघमारे यांनी दिली. या बैठकीस संमेलनाचे स्वागताध्यक्ष जितेंद्र वासनिक यांची प्रमुख उपस्थिती होती, तर बैठकीच्या अध्यक्षस्थानी बौद्ध साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे हे होते. यावेळी नववे बौद्ध साहित्य संमेलनाच्या संमेलनाध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ.प्रकाश खरात यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या बैठकीस मागील संमेलनाचे स्वागताध्यक्ष ॲड.सुनील सौंदरमल यांच्यासह प्रा. डी.जी.धाकडे, डॉ.शंकर वाघमारे, राजेंद्र सगर, पी.व्ही.जाधव, डॉ.संजय वाघ, डॉ.अशोक डोळस, डॉ.राहुल धाकडे, डॉ.बाबासाहेब हिरवे आदी सदस्य उपस्थित होते. यावेळी स्वागताध्यक्ष जितेंद्र वासनिक यांनी संमेलन सर्वार्थाने यशस्वी व दर्जेदार करण्याचे आश्वासन दिले. बौद्ध साहित्य संमेलन हे चार सत्रांत आयोजित करण्यात आले आहे. यात उद्घाटन, परिसंवाद, कवि संमेलन आणि समारोप असे स्वरूप आहे. या संमेलनात विशेष पुरस्कार दिले जातात. यात संशोधनासाठी राहुल सांकृत्यायन पुरस्कार, अनुवादासाठी डॉ.भदन्त आनंद कौशल्यायन पुरस्कार, कवितेसाठी अश्वघोष पुरस्कार, सामाजिक कार्यासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार, चित्रकलेसाठी अजिंठा पुरस्कार, पाली भाषा आणि वाङ्मय या क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्यांसाठी सतिशचंद्र विद्याभूषण आदि पुरस्कार देण्यात येणार आहेत. संमेलनाची तारीख व सविस्तर कार्यक्रम लवकरच जाहीर करण्यात येईल अशी माहिती बौद्ध साहित्य परिषदेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.कमलाकर कांबळे यांनी दिली. तर आमच्या प्रतिनिधीशी बोलताना नववे बौद्ध साहित्य संमेलनाचे नवनिर्वाचित संमेलनाध्यक्ष ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ.प्रकाश खरात यांनी सांगितले की, मी नम्रपणे नववे बौद्ध साहित्य संमेलनाचे अध्यक्षस्थान स्विकारत आहे. असे सांगून यापूर्वी झालेल्या सर्व आदरणीय संमेलन अध्यक्षांची समृद्ध वैचारिक परंपरा पुढे नेईन असेही डॉ.खरात यांनी म्हटले आहे.



**प्राचार्य डॉ.प्रकाश खरात**
(संमेलनाध्यक्ष, नववे बौद्ध साहित्य संमेलन, नागपूर)

## संमेलनाध्यक्ष प्राचार्य डॉ.प्रकाश खरात यांचा परिचय

नवव्या बौद्ध साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ साहित्यिक प्राचार्य डॉ.प्रकाश खरात यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. बौद्ध साहित्य परिषदेच्या केंद्रीय कार्यकारिणीच्या बैठकीत सदर निर्णय सर्वानुमते घेण्यात आला. डॉ.खरात यांची फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांवर अढळ निष्ठा आहे. ते बौद्ध साहित्य चळवळीचे खंदे पुरस्कर्ते आहेत. दिक्षा भूमीवर असलेल्या डॉ.आंबेडकर महाविद्यालयात ते प्राध्यापक, उपप्राचार्य आणि प्राचार्य म्हणून ही कार्यरत होते. पाली भाषा, साहित्याचे गाढे अभ्यासक म्हणून त्यांची सर्वदूर ओळख आहे. प्राचार्य डॉ.प्रकाश खरात यांची साहित्यसंपदा पुढीलप्रमाणे आहे. १) बौद्ध धम्माची चिंतनयात्रा, २) बुद्ध आणि नदी, ३) साहित्याचे समाजशास्त्रीय अंतरंग, ४) नव्या सूर्याचा आदिबंध, ५) डॉ.आंबेडकरांची साहित्य मिमांसा, ६) आंबेडकरवादी कथा समीक्षा, ७) डॉ.आंबेडकर : क्रांती आणि संस्कृती, ८) प्रकाश खरात गौरव ग्रंथ याशिवाय त्यांचे कथा, कविता, स्फूटलेखन व असंख्य वैचारिक लेख ही प्रसिद्ध आहेत.

# नागरिकांच्या तक्रारी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी

## रेणापूर तालुका आढावा बैठकीत आ.रमेशअप्पा कराड यांची सूचना





■ लातूर प्रतिनिधी

टंचाईच्या उपाययोजना तात्काळ कराव्यात, मंजूर असलेल्या रस्त्याची कामे जलद गतीने सुरू करा, स्वस्त धान्य दुकानातील धान्याचा काळाबाजार खपवून घेणार नाही, कोट्यावधी खर्चाच्या पाणीपुरवठा योजनेचा उद्देश नागरिकांना शुद्ध पाणीपुरवठा करून सफल करावा आणि विविध वैयक्तिक लाभाच्या योजनेच्या तक्रारी येणार नाहीत याची संबंधितांनी काळजी घ्यावी अशी सूचना या बैठकीत आ. रमेशअप्पा कराड यांनी केली.

रेणापूर तालुक्यातील विविध विकास कामाचा आढावा आ. श्री. रमेशअप्पा कराड यांनी रेणापूर येथील पंचायत समिती सभागृहात शुक्रवारी घेतला या बैठकीस रेणापूर - औसा उपविभागीय अधिकारी अविनाश कोरडे, तहसीलदार प्रशांत थोरात, पंस सभापती सौ. मोनिका सूर्यवंशी, उपसभापती शरद दरेकर, रेणापूरच्या नगराध्यक्ष श्रीमती शोभाताई अकनगिरे, गटविकास अधिकारी सुमित जाधव, जिप बा. उप अभियंता एस. जी. कुलकर्णी, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे उप अभियंता वाहेद देशमुख, गटशिक्षणाधिकारी कृष्णा भराडिया, महावितरण चे उप अभियंता काळे, तालुका आरोग्य अधिकारी श्रीधर रेड्डी, बालविकास प्रकल्प अधिकारी उज्वला देशपांडे, पुरवठा विभागाच्या नायब तहसीलदार लांडगे यांच्यासह महेंद्र गोडभरले, अनिल भिसे, दशरथ सरवदे, पंचायत समितीचे सदस्य विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी, उपस्थित होते.

सदर बैठकीत आ. श्री. रमेशअप्पा कराड यांनी विविध विभागातील कामकाजाचा आढावा घेताना कामाची कुचराई करणाऱ्या कर्मचाऱ्यांसह अधिकाऱ्याची गय केली जाणार नाही असे सांगून गौण खणीज उत्खननाची चोरून विक्री होत असेल तर त्यावर ॲक्शन घेण्यात यावी, कोट्यावधी रुपये खर्च करून त्या गावात नागरिकांना पाणीपुरवठा होत नसेल तर योजनेचा काय उपयोग असा प्रश्न उपस्थित करून संबंधितांनी त्यातील दोष अडचणी समजून घेऊन योजनेचा उद्देश सफल करावा असे बोलून दाखविले.

स्वस्त धान्य दुकानातून खातेधारकांना धान्य मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी आहेत गोरगरिबाचे धान्य काळ्या बाजारात जाणार असेल तर खपवून घेतले जाणार नाही असे सांगून आ. रमेशअप्पा कराड म्हणाले की, शासनाच्या वैयक्तिक लाभाच्या शेतकरी सन्मान योजना, लाडकी बहीण योजना, निराधारांच्या पगारी यासह विविध योजनेपासून एकही पात्र लाभार्थी वंचित राहू नये वैयक्तिक लाभाच्या योजनेबाबत मोठ्या प्रमाणात तक्रारी असून याबाबत खबरदारी घेऊन कोणाचीही अडवणूक आणि पिळवणूक होणार नाही याची काळजी घ्यावी असेही आ. रमेशअप्पा कराड यांनी बैठकीत बोलून दाखवले. या बैठकीस लोकप्रतिनिधी पदाधिकारी विविध गावचे सरपंच नागरिक उपस्थित होते.

# परळी वैजनाथ येथे रामनवमी निमित्त सुप्रसिद्ध गायक श्रीधर फडके यांचा गीत रामायण' भावस्पर्शी सुरेल सोहळा रंगणार

**वैद्यनाथ देवल कमिटीचा उपक्रम**

■ परळी वैजनाथ,(प्रतिनिधी)

रामभक्तांच्या मनाला भक्तीभावाने भारावून टाकणारा आणि मराठी संस्कृतीचा अमूल्य ठेवा ठरलेला 'गीत रामायण' हा सुरेल सोहळा यंदाच्या रामनवमी निमित्ताने परळी वैजनाथ येथे रंगणार आहे. वैघनाथ देवस्थान ट्रस्टच्या वतीने आयोजित या विशेष कार्यक्रमामुळे भक्ती, संगीत आणि अध्यात्म यांचा अनोखा संगम अनुभवायला मिळणार आहे. या कार्यक्रमाचा लाभ तमाम भाविक भक्तांनी घ्यावा असे आवाहन वैद्यनाथ देवल कमेटीच्या वतीने करण्यात आले आहे.




मराठी साहित्यातील दिग्गज कवी ग. दि. माडगुळकर यांच्या अप्रतिम शब्दांना आणि सुप्रसिद्ध संगीतकार सुधीर फडके (बाबूजी) यांच्या सुरेल संगीताला लाभलेले 'गीत रामायण' आजही रसिकांच्या मनात घर करून आहे. या अजरामर कलाकृतीला सुप्रसिद्ध गायक श्रीधर फडके यांच्या सुमधूर आवाजातून नवसंजीवनी मिळणार आहे.

रविवार, दि. २९ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता श्री वैजनाथ मंदिराच्या पायथ्याशी (उत्तर बाजू परिसर) हा कार्यक्रम सादर होणार आहे. या कार्यक्रमात रामायणातील विविध प्रसंग सुरेल गीतांच्या माध्यमातून सादर होणार असून, उपस्थितांना भक्तीमय वातावरणात एक वेगळीच आध्यात्मिक अनुभूती लाभणार आहे.

या कार्यक्रमासाठी वैजनाथ देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष तथा परळीचे तहसीलदार श्री. विनोद सुभाषराव रणवरे, वैद्यनाथ देवन कमिटीचे सेक्रेटरी श्री. बाबासाहेब वामनराव देशमुख तसेच सर्व विश्वस्तांनी, भाविकांना मोठ्या संख्येने उपस्थित राहून या सुरेल मेजवानीचा लाभ घेण्याचे आवाहन केले आहे. रामनवमीच्या पावन पर्वावर आयोजित हा 'गीत रामायण' सोहळा परळीकरांसाठी निश्चितच एक संस्मरणीय सांस्कृतिक पर्व ठरणार आहे.

# भारतीय जनता पार्टीच्या आष्टी विधानसभा प्रमुखपदी गणेश शिंदे यांची निवड

■ आष्टी (प्रतिनिधी)



भारतीय जनता पक्षाच्या आष्टी विधानसभा प्रमुखपदी गणेश शिंदे यांची निवड करण्यात आली आहे. त्यांच्या साधेपणा, प्रभावी जनसंपर्क आणि कामाबद्दलच्या निष्ठेमुळे पक्षश्रेष्ठींचा त्यांच्यावर विश्वास बसला असून ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपविण्यात आली आहे.

पक्षाच्या मतदार याद्यांच्या पुनर्निरीक्षणासाठी सुरू असलेल्या 'एस.आय.आर.' अभियानांतर्गत बी.एल.ए. वन (BLA-1) म्हणूनही त्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या माध्यमातून विधानसभा क्षेत्रातील मतदार याद्यांचे पुनर्निरीक्षण करण्याचे महत्त्वाचे काम ते पार पाडणार आहेत. त्यांच्या अनुभवाचा आणि कार्यशैलीचा उपयोग पक्ष संघटन बळकट करण्यासाठी होईल, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नियुक्तीपत्रातून व्यक्त करण्यात आला आहे.

सर्वसामान्य कार्यकर्त्यांमधून पुढे आलेल्या शिंदे यांच्या निवडीमुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आपल्या निवडीबद्दल बोलताना गणेश शिंदे यांनी, "पक्षाने दिलेल्या जबाबदारीचे गांभीर्य ओळखून तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेऊन संघटना अधिक सक्षम करण्यासाठी मी प्रामाणिकपणे काम करेन," असा निर्धार व्यक्त केला. तसेच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण आणि आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांच्या मार्गदर्शनाखाली पक्ष संघटना अधिक प्रभावीपणे कार्य करेल, असेही त्यांनी सांगितले. गणेश शिंदे यांच्या या निवडीचे विविध स्तरांतून स्वागत होत असून, त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



# विद्यार्थ्यांसाठी केलेली गुंतवणूक भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची : पद्मश्रीताई धर्माधिकारी

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या निमित्ताने नगरसेविका कविता इंगळे यांच्याकडून वाचनालयास पुस्तके भेट

■ परळी वैजनाथ (प्रतिनिधी)

विद्यार्थ्यांसाठी विद्यार्थ्यांसाठी केलेली गुंतवणूक भविष्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन परळीच्या नगराध्यक्षा सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी केले.त्या डॉ.भालचंद्र वाचनालयासाठी नगरसेविका कविता अनंत इंगळे यांच्यावतीने भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त अभ्यासिकेसाठी स्पर्धा पुस्तके भेट देण्यात आली.त्या स्विकारतांना त्या बोलत होत्या. नगरसेविका सौ .कविता अनंत इंगळे यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 135 जयंती निमित्ताने परळीचे वैभव असलेल्या डॉ.भालचंद्र वाचनालयातील स्पर्धा परीक्षेसाठी तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उभारण्यात आलेल्या अभ्यासिकेसाठी स्पर्धा परीक्षा पुस्तके भेट दिली. ही पुस्तके नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, शिक्षण सभापती योगेश मेनकुदळे, ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड, पत्रकार अनिरुद्ध जोशी,शंकरराव साळवे, सामाजिक कार्यकर्ते नवनाथ दाने यांच्या हस्ते मुलांना अभ्यासासाठी देण्यात आली. याप्रसंगी नगराध्यक्षा सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांनी उपस्थित विद्यार्थी, विद्यार्थ्यांनिंना मार्गदर्शन केले.तसेच वाचनालय आणि अभ्यासिकेसाठी सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देऊ असे आश्वासन दिले.याप्रसंगी रानबा गायकवाड यांनी नगरसेविका कविता अनंत इंगळे यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त दिलेल्या पुस्तकांविषयी आणि बाबासाहेबांच्या ग्रंथ प्रेमाबद्दल माहिती दिली.याप्रसंगी अशोक दहिवडे, पत्रकार महादेव गिते, जयराम गोंडे, रावसाहेब जगतकर यांच्यासह विद्यार्थी ,विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अमृत पॅटर्न चा डंका समुद्रापार ईटालीयन शेती तज्ञांची कापूस प्लाटला भेट

■ महागाव प्रतिनिधी

यवतमाळ जिल्ह्याची ओळख अख्या जगात शेतकरी आत्महत्याग्रस्त जील्हा म्हणुन झालेली ओळख व महाराष्ट्र राज्यातील कापुस उत्पादक जील्हा म्हणुन मागील अनेक दशके आसलेली ओळख आज अमृत पॅटर्न च्या यशस्वी घोडदौड मुळे समुद्रापार गेल्याने महागाव तालुक्यातील एक छोट गाव अंबोडा आणि या गावातील एक प्रयोगशील ध्येयवेडा शेतकरी म्हणजे अमृत पॅटर्न चे जनक अमृतराव देशमुख मागील तीस ते पस्तीस वर्षांपासून आपल्या शेतात कापुस, सोयाबीन,चणा,ऊस अशा विविध पिकावर यशस्वी प्रयोगशीलता जपत त्यांनी सतत स्वताचे व ईतर नामांकित विद्यापीठांमध्ये कार्यरत आसलेल्या शेती संशोधकाचे एकरी ऊत्पादनाचे सर्व रेकार्ड मोडले आहेत विशेष म्हणजे दरवर्षी ऊत्पादनाचा आलेख चढता क्रम असल्याने राज्यातील व राज्याबाहेरील लाखो शेतकरी, पदाधिकारी शेती शास्त्रज्ञ इत्यादींनी त्यांच्या शेताला भेटी दिल्या आहेत व याची देही,याची डोळा स्वतः अनुभव घ्यावा या म्हणीचा प्रत्यय घेऊन अनेकांनी त्यांच्या पद्धतीने व मार्गदर्शन घेऊन आपल्या ऊत्पादनात भरीव अशी वाढ केली आहे यांची शेती ही शेती नसुन एक प्रयोगशाळा बनली आहे चीलगव्हान येथील साहेबराव करपे यांची देशातील पहीली सहकुटुंब शेतकरी आत्महत्या याच शिवारात झाली होती हे या ठिकाणी विशेषत्वाने नमुद करावे लागेल आणि आज याच शिवारात शेतकर्यांना आत्महत्या करण्यापासुन वाचवण्यासाठी याच शिवारातील अमृतराव देशमुख यांचा यशस्वी प्रयोग गगन भरारी घेतो आहे हा दुर्मिळ योगायोग समजावा की, नैसर्गिक चमत्कार कुठलीही अनुकुल परीस्थिती नसतांना एकरी 40क्वीटंल कापुस,20क्वी सोयाबीन, चणा एकरी 18 क्विंटल,उस एकरी 85टण ही साधारण बाब नाही आच मार्च च्या शेवटी सर्व राज्यातील कापुस हंगाम आटोपला परंतु देशमुख यांच्या शेतातील कापुस भरावर आहे आणि आजुन दोन महिने ऊनंगवाडी होणार नाही त्यामुळे कपाशी पिक हे हंगामी नसुन वार्षिक आसल्याचे सीध्द होत आहे ही यशस्वी प्रयोगशीलता समुद्रापार गेल्याने ईटली या देशातील एक टिम मागील पंधरवड्यात भेट देऊन माहिती घेऊन गेली व देशमुख यांना ईटली दौऱ्यावर येण्यास विनंती केली यात प्रामुख्याने नुरीना,फ्रान्सको,लुरो हे ईटालीचे शेती तज्ञ होते तर त्यांचे सहकारी मुंबई येथील राज हे सुद्धा होते कपाशी प्लाट बघुन आश्चर्यचकित झाले यावेळी स्थानिक चे बाळुपाटील दुपात्रे,सतीष ठाकरे,व अमृत पॅटर्न चे जनक अमृतराव देशमुख व संचालक दिनेश देशमुख सुध्दा उपस्थित राहुन सवीस्तर मार्गदर्शन केले यानंतर अमेरीकन कापुस संशोधक सुध्दा प्लाटला भेट देण्यासाठी येणार असल्याचे देशमुख यांनी यावेळी सांगितले अमृतराव देशमुख यांच्या यशस्वी प्रयोगशीलतेची कहानी विदेशातील तज्ञापर्यतं जाऊन पोहचली आणि तीथुन इथपर्यंत माहीती घेण्यासाठी येतात परंतु आपल्या देशातील व राज्यातील शासनाला किवां शास्त्रज्ञ इत्यादींना वेळ नाही किंवा ईच्छशत्की नाही हे दुर्दैवच म्हणावे लागेल.

